मिरा रोड ते चेणा विभागातील मिरा रोड येथे भरणारा आठवडी सोमवार बाजार व उड्डाण पुलावजवळ भरणारा आठवडी शनिवार बाजार यामुळे रहदारीस व वाहतुकीस अडचण व होणाऱ्या चोऱ्या, वाढणारे प्रदुषण, यामुळे या बाजारा विषयी नागरीकांमध्ये प्रचंड असंतोष आहे. तेव्हा ते दोन्ही बाजार ताबडतोब बंद करावेत.

भाईंदर (पश्चिम), भाईंदर (पूर्व), मिरारोड ते चेणा विभागाकरीता लिलाव पद्धतीने बाजार फी वसूलीचा मक्ता देण्यांत आला आहे. मक्ता देताना ज्या अटी-शर्ती ठरविण्यांत आल्या आहेत. त्या अटी-शर्ती नुसार ज्या भागात फेरीवाल्यांना बसण्यांस परवानगी देण्यांत आली आहे. त्या व्यतीरीक्त अन्य सर्व ना-फेरीवाला क्षेत्र, सार्वजनिक रस्त्यावर बसणाऱ्या फेरीवाल्यांकडून बाजार फी वसुल करणाऱ्या ठेकेदाराविरुध्द कराराचा भंग केला म्हणून दंडात्मक कायदेशीर कारवाई करावी.

महानगरपालिका क्षेत्रात ज्या ठीकाणी फेरीवाला क्षेत्र घोषित करण्यांत आले आहे. त्या क्षेत्रात मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांच्या निर्णयाच्या अधिन राहून फेरीवाला क्षेत्रासाठी प्रशासनाने कार्यवाही करण्यात यावी.

**सुचक :- श्री. लक्ष्मण गणपत जंगम** **अनुमोदक :- श्री. राजेश शंकर वेतोस्कर**

**सदर ठरावात सन्मा. सदस्य श्री. भगवती शर्मा यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे**

भाईंदर (प.) विभाग

फेरिवाला क्षेत्र

(१) बाबासाहेब आंबेडकर मार्ग, महावीर अपार्टमेन्ट ते (सालासर) विनायक पॅलेस बिल्डींग पर्यंतचा रस्ता.

(२) रेल्वे फाटक समोरील रस्त्यावर कमला पार्क व वॅलचंद कॉम्प्लेक्स पर्यंत.

(३) या शिवाय सर्व भाग ना फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करावेत.

**ना फेरिवाला क्षेत्र**

(१) भाईंदर (प.) विनायक पॅलेस जैन मंदिरच्या बाजूने देवचंदनगरकडे जाण्याच्या दोन्ही गल्ल्या.

(२) चर्च ते महानगरपालिका (जुने) हे दोन्ही ना फेरीवाला क्षेत्रामध्ये समाविष्ट करावे.

**सदर ठरावात सन्मा. सदस्या श्रीम. वंदना चक्रे यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.**

प्रभाग क्र. ७१ विजयपार्क ते शिवपुजा बिल्डींग व पंजाब नॅशनल बँक या रस्त्यावर फेरीवाला क्षेत्र नमुद करावे ही विनंती

सदर ठरावात सन्मा. सदस्या सौ. अनिता जयवंत पाटील यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.

दहिसर चेक नाक्यावरुन पेणकरपाड्याकडे जाणारा रस्ता (सागर हॉटेल ते बॉम्बे बॉटल कंपनी पर्यंतचा रस्ता फेरीवाला झोन करण्यात यावा.

**सदर ठरावात सन्मा. सदस्या सौ. ज्योत्स्ना हसनाळे यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.**

सदर ठरावात ना फेरीवाला क्षेत्रामध्ये गावदवी मंदिर मार्ग (जरीमरी तलाव रोड, काशिमिरा) नमुद करण्यात यावे.

सदर ठरावात सन्मा. सदस्य श्री. शरद पाटील यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.

नर्मदा कुंज (रावलनगर) ते सुलभ शौचालय येथे बसवू नये.

**सदर ठरात सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.**

सदर ठरावात ना फेरीवाला क्षेत्रात नमूद नसलेल्या रस्त्याच्या एकतर्फी फेरीवाले बसवावे. राममंदिर भाईंदर (प.) येथे फेरीवाले हटवून नाझरेथ चर्चच्या बाजूने मोतीनगर येथे जाणारा रस्ता फेरीवाले बसवणे. फेरीवाला क्षेत्रात बसणाऱ्या फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात येवू नये. तसेच शिवार गार्डन पासून पुढे सरदार वल्लभभाय शाळेकडे जाणाऱ्या शिवार गार्डनच्या लागून असलेल्या बाजूस फेरीवाले बसवणे. तसेच १ महिन्या अगोदर बाजार लिलावाचा ठेका दिला आहे. त्यात या जागा, रस्ता यांचा समाविष्ट करावा अशी सुचना मी मांडत आहे. ती मंजुर करुन घ्यावी. संबंधीत प्रकरणे मा. महासभा, स्थायी समिती सभाचे ठराव व्यपगत करावे. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च् न्यायालय यांचे वेळोवेळी दिलेल्या न्यायालयीन निर्बंधाचे पाळण करावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर